# प्रेसनोट

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्रं. 388/2023 दिनांक : 11.10.2023

## 1)खुनाचा प्रयत्न करून, जबरी चोरी :–

**1)भाग्यनगर :–** दिनांक 10.10.2023 रोजी चे 12.30 वा. चे सुमारास, **व्यंकटेश्वरानगर समोर वैभव जीम समोर कॅनलरोड नांदेड येथे,** यातील अनोळखी आरोपीने फिर्यादी ही घरात एकटी असतांना तिचे राहाते घरात जावुन घराचे दार आतुन बंद करून फिर्यादीस पैसे व दागीने काढुन दे नाहीतर जिवे ठार मारतो अशी धमकी देवुन गळा, तोंड, व नाक दाबुन फरशीवर डोके आपटुन तसेच धारदार चाकुने फिर्यादीच्या गळयावर, डोक्यावर, गालावर, हातावर तसेच बोटावर वार करून गंभीर जखमी करून डांबुन ठेवुन खुन करण्याचा प्रयत्न केला. व फिर्यादीचे गळयातील दोन मनी मंगळसुत्र असलेली पोत पाच ग्रॅमची किंमती 16,000/–रूपयाची असलेली जबरीने हिसकावुन घेवुन तसेच घरातील बेडवरील फिर्यादीचा सॅमसंग कंपणीचा मोबाईल किंमती अंदाजे 5000/–रू चा जबरीने चोरून घेवुन निघुन गेला. वगैरे **फिर्यादी सौ. शुभांगी आशिष दोडके, वय 38 वर्षे, व्यवसाय गृहणी रा. व्यंकटेश्वरानगर समोर वैभव जीमसमोर कॅनलरोड नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरन 373/2023 कलम 307, 394, 397, 452, 342, 506, भादवी सह कलम 5/25, 27 भाहका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री विनोद चव्हाण, मो.क्रं. 7020408595** हे करीत आहेत.

## 2)घरफोडी :–

**किनवट :–** दिनांक 10.10.2023 रोजी चे 01.00 ते 03.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे राहाते घरी अशोक नगर गोकुंदा ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी व तिची मुलगी घरी झोपलेली असतांना कोणीतरी अज्ञात चोरटयाने घराचे दाराची कडी वाकवुन कपाटामध्ये ठेवलेले सोन्या व चांदीचे दागिने किंमती 1,29,000/–रूपये व रोख रक्कम 87,000/–रूपये असा एकुण 2,16,000/–रूपयाचा ऐवज चोरून नेले. वगैरे **फिर्यादी सुभाष सोनबा ताजने, वय 58 वर्षे, व्यवसाय वकिली रा. अशोकनगर गोकुंदा ता. किनवट जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे किनवट** गुरन 241/2023 कलम 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री भारत सावंत, मो. क्रं. 9923612402** हे करीत आहेत.

## 3)मो. सा. चोरी :–

**1)उमरी :–** दिनांक 05.10.2023 रोजी चे सकाळी 06.00 वा. चे पुर्वी, **फिर्यादीचे मुलीचे घरा समोरून व्यंकटेशनगर उमरी ता. उमरी जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची स्पलेंडर प्लस कंपणीची मो. सा. क्रं एमएच–26/एक्यु–5845 किंमती 20,000/–रूपयाची नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी व्यंकटी काळबा बैनवाड, वय 67 वर्षे, व्यवसाय सेवानिवृत्त रा. चिंचाळा ता. उमरी जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उमरी** गुरन 278/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2018 वडजे, मो. क्रं. 9765770158** हे करीत आहेत.

**2)विमानतळ :–** दिनांक 30.09.2023 रोजी चे 17.00 ते दि.01.10.2023 चे 09.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे राहाते घरा समोरून खतगावकर साहेब यांचे वॉल कंपाऊड जवळ नांदेड येथे,** यातील फिर्यादीची होंडा डीआयो कंपणीची मो. सा. क्रं एमएच–26/बीजे–5636 किंमती 25,000/–रूपयाची नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी मंगेश विश्वनाथ चाभरेकर, वय 38 वर्षे व्यवसाय नौकरी रा. वसंतनगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरन 329/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/721 शेख जावेद, मो. क्रं. 9923588117** हे करीत आहेत.

## 4)चोरी :–

**नांदेड ग्रामीण :–**दिनांक 04.10.2023 रोजी चे 22.00 ते 05.10.2023 चे 07.00 वा. चे दरम्यान, **कालीका रोलींग फॅक्ट्रीचे परीसरात एमआयडीसी सिडको नांदेड येथे,** यातील अज्ञात चोरटयाने स्पिनींग मशिनरीचे दोन मोटारी क्रॉम्पटन कंपणीचे 2 एचपी सेटींगचे पार्ट व प्रेसींगचे दोन मोटारी क्रॉम्पटन कंपणीचे 3 एचपी व पार्ट असे अंदाजे किंमती 1,20,000/–रूपयाचा भंगार सामान कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी महेश मधुकर येवनकर, वय 44 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. शिवाजीनगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 720/2023 कलम 379, भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/581 मांजरमकर, मो.क्र. 9923696860** हे करीत आहेत.

## 5)विवाहीतेचा छळ :—

**भाग्यनगर :—** दिनांक 19.02.2010 रोजी ते दिनांक 10.10.2023 पावेतो, **फिर्यादीचे सासरी अरूणोदयनगर सम्यक बौध्द विहार नांदेड येथे,** यातील नमुद आठ आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस शारिरीक व मानसीक छळ करून शिवीगाळ व मारहाण करून उपाशी पोटी ठेवुन गुत्तेदारी करण्यासाठी फिर्यादीस तुझे माहेरहुन दोन लाख रूपये आणली नाहीस तर तु नांदवण्या करीता येवु नकोस असे म्हणुन जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 31 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 372/2023 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास मपोना/206 मालवाड, मो.क्रं. 8888802387** हे करीत आहेत.

## 6)आश्रम शाळेत जावुन मारहाण :—

**लोहा :—**दिनांक 10.10.2023 रोजी चे 14.30 वा. चे सुमारास, **प्रा. आश्रम शाळा विठ्ठलनगर लोहा ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील नमुद पाच व इतर आरोपीतांनी गैरकादयाची मंडळी जमवुन आश्रम शाळेमध्ये जाऊन फिर्यादीच्या ऑफिसमध्ये बेकायदेशिर प्रवेश करून फिर्यादीस शिवीगाळ व धक्काबुक्की केली व फिर्यादीस व विद्यार्थ्यांना खतम करतो म्हणुन जिवे मारण्याची धमकी देवुन आश्रम शाळेचे महत्वाचे कागदपत्र व दस्ताऐवज फाडुन तसेच मोबाईल फोडुन नुकसान केले व शाळेची जागा खाली कर नाहीतर विद्यार्थ्यांचा मर्डर करू अशी धमकी दिली. वगैरे **फिर्यादी पंडीत मोहनराव राठोड, मुख्याध्यापक, वय 54 वर्षे, रा. प्राथमीक आश्रम शाळा विठ्ठलनगर लोहा ता. लोहा जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे लोहा** गुरन 238/2023 कलम 452,143, 504, 506, 427 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री हलसे, मो. नं. 9552781091** हे करीत आहेत.

## 7)जुगार :—

**1)कंधार :—** दिनांक 10.10.2023 रोजी चे 17.20 वा. चे सुमारास, **जि. प. शाळा कंधारचे ग्राउंडचे बाजुस नवी शॉपींग सेंटर जवळ रोडवर कंधार ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिरीत्या कल्याण नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना 1410/—रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी सपोनि/श्री आदित्य निवृत्तीराव लोणीकर, ने. पोस्टे कंधार** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कंधार** गुरनं 311/2023 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2059 सानप, मो. क्रं. 9421849989** हे करीत आहेत.

**2)लिंबगाव :—** दिनांक 10.10.2023 रोजी चे 10.30 वा. चे सुमारास, **मौ. नाळेश्वर बसस्थानक ता. जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिरीत्या कल्याण नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना 1910/—रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोना/692 शेख महमद जावेद पि. महमद इब्राहीम, ने. उपविपोअ कार्यालय नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लिंबगाव** गुरनं 140/2023 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री सुर्यवंशी, मो. क्रं. 9011472297** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड